SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

शुक्रवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०२४

अधिसूचना

क्रमांक : ११२/२०२४. **दिनांक : १३/०९/२०२४.**

विषय :- कॅरी ऑन देण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये दुरुस्तीबाबत..

संदर्भ :- विद्यापीठ अधिसूचना क्रमांक १०७/२०२४, दि. ०५/०९/२०२४

सर्व संबंधितांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, संदर्भांकित अधिसूचनेद्वारे विद्यार्थ्यांचे भवितव्य विचारामध्ये घेऊन कॅरी ऑन देण्याबाबतची अधिसूचना यापुर्वी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तथापि, मा. कुलगुरूंनी संदर्भांकित अधिसूचनेमध्ये दुरुस्ती करण्याबाबत मान्यता दिली असून सुधारित अधिसूचना खालीलप्रमाणे वाचण्यात यावी व त्याबाबत दुरुस्तीची नोंद घेण्यात यावी.

"सर्व विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य विचारामध्ये घेऊन सत्रांत, विषमसत्र, सत्र पद्धती, सी.बी.एस.एस. सत्र प्रणाली, सी.बी.सी.एस. आणि पदव्युत्तर एन.ई.पी.-२०२० शी संबंधित तत्सम सर्व परीक्षांकरीता बसलेल्या विद्यार्थ्यांकरीता श्रेयांक वितरणासह केवळ शैक्षणिक सत्र २०२४-२५ करीता थेट प्रवेश (Full Carry On) देण्याचा निर्णय तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे."

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****